DAY - 7 SEAT NUMBER

2024	II	28	1100	M - 665	(M)

HORTICULTURE
PAPER - I (KA)
VEGETABLE PRODUCTION

Time : 3 Hours	4 Pages	Max. Marks : 80

१. (अ) योग्य पर्याय निवडून खालील विधाने पूर्ण करा : ६

(अ) 'ड' जीवनसत्त्वाच्या कमतरतेमुळे __________ हा विकार होतो.

(i) बेरीबेरी

(ii) रातआंधळेपणा

(iii) मुडदूस

(iv) वांझपणा

(ब) दुरवरच्या बाजारपेठेसाठी भाजीपाला लागवड प्रकाराला __________ असे म्हणतात.

(i) ट्रक गार्डन

(ii) मार्केट गार्डन

(iii) परसबाग

(iv) प्रक्रियेसाठी भाजीपाला बाग

(क) कोबी या भाजीपाला पिकाचे वनस्पतीशास्त्रीय नाव __________ आहे.

(i) *ब्रॅसिका ओलेरेसिया व्हरा. कॅपिटाटा*

(ii) *ब्रॅसिका ओलेरेसिया व्हरा. बॉट्रायटील*

(iii) *सायमॉप्सीस टेट्रागोनोलोबा*

(iv) *कॅप्सिकम ॲनम*

https://www.maharashtrastudy.com

(ड) टोमॅटोतील लाल रंग ____________ या रंगकणामुळे येतो.

(i) कॅप्सेसीन

(ii) कॅप्सेन्थीन

(iii) लायकोपीन

(iv) कुकुरबिटॅसीन

(इ) खालीलपैकी ____________ हे एक बुरशीनाशक आहे.

(i) मोनोक्रोटोफॉस

(ii) मोरचूद

(iii) जिब्रेलिन्स

(iv) बासालीन

(फ) हरितगृहात ____________ या भाजीपाला पिकांची लागवड केली जाते.

(i) चेरी टोमॅटो

(ii) कलिंगड

(iii) गवार

(iv) बटाटा

(ब) योग्य जोड्या जुळवा : ५

गट 'अ'	गट 'ब'
(अ) जीवनसत्त्व 'क'	(i) परभणी क्रांती
(ब) गवार	(ii) तांबड्या रक्तपेशींचा महत्त्वाचा घटक
(क) मिरची	(iii) भाजीपाला बीजोत्पादन
(ड) लोह	(iv) ॲस्कॉर्बिक आम्ल
(इ) भेसळ काढणे (रोगींग)	(v) पुसा ज्वाला
	(vi) अवर्षण प्रतिकारक भाजीपाला

https://www.maharashtrastudy.com

(क) 'चूक' की 'बरोबर' ते लिहा : ५

(अ) टोमॅटो पिकांत छाटणी व वळण दिल्यामुळे रोग व किडिंचे नियंत्रण करण्यास मदत होते.

(ब) बटनिंग ही फुलकोबीतील शारीरिक विकृती आहे.

(क) टोमॅटो ही क्षार सहनशील भाजीपाला पीक आहे.

(ड) काकडी हे स्वपरागसिंचीत भाजीपाला पीक आहे.

(इ) थंड हवामानाच्या प्रदेशात ग्रिनहाऊस इफेक्ट संकल्पनेचा वापर हरितगृहातील तापमान वाढविण्यासाठी केला जातो.

२. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा : **(कोणेतही आठ)** १६

(१) परसबागेची व्याख्या लिहा.

(२) मिश्र पीक पद्धती म्हणजे काय ?

(३) फुलकोबीतील ब्लॅंचिंग म्हणजे काय ?

(४) स्वपरागसिंचित भाजीपाला पिकांची दोन नावे लिहा.

(५) संकरजोम म्हणजे काय ? https://www.maharashtrastudy.com

(६) भाजीपाला उत्पादन रचनातंत्राचे कोणतेही दोन प्रकार लिहा.

(७) भांडवलदारी शेतीचे दोन फायदे लिहा.

(८) भाजीपाला शेतीत निरोगी भाजीपाला रोपांची निर्मिती कशी करतात ?

(९) भाजीपाला पिकांना संरक्षक अन्न असे का म्हणतात ?

(१०) भाजीपाला शेती व्यवस्थापन व्याख्या लिहा.

(११) कलिंगडाच्या दर्जेदार उत्पादनासाठी दोन जाती लिहा.

(१२) भाजीपाला उत्पादनाशी कोणते अस्थिर खर्च निगडीत असतात ?

३. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा : **(कोणतेही चार)** १६

(अ) भाजीपाला पिकातील सघनदाट लागवड पद्धत स्पष्ट करा.

(ब) भाजीपाला बियाण्यांच्या प्रकारांविषयी माहिती लिहा.

(क) बटाटा बेण्याची निवड याविषयी माहिती लिहा.

(ड) हरितगृहासाठी जागेची निवड करताना कोणत्या बाबी विचारात घ्याव्यात ते लिहा.

(इ) सेंद्रिय भाजीपाला पिकांतील किड नियंत्रणासाठी सापळा पिकांचा वापर याविषयी टिप लिहा.

(फ) मिरचीच्या दर्जेदार व गुणवत्तापूर्ण उत्पादनासाठी योग्य जाती व त्यांची वैशिष्ट्ये लिहा.

https://www.maharashtrastudy.com

४. खालील प्रश्न सोडवा : (कोणतेही चार) १६

(अ) बटाट्यातील शारीरिक विकृती/दोष लिहा.

(ब) सेंद्रिय शेतीमुळे जमिनीवर होणारे चांगले परिणाम लिहा.

(क) विदेशी भाजीपाला लागवडीचे महत्त्व स्पष्ट करा.

(ड) विदेशी भाज्याची प्रतवारी व पॅकिंग याविषयी माहिती लिहा.

(इ) संजीवकांचे भाजीपाला उत्पादनातील महत्त्व स्पष्ट करा.

(फ) भाजीपाला रोपांचे कठिणीकरण म्हणजे काय ? ते सांगून रोपांच्या कठिणीकरणाच्या पद्धती विषयी माहिती लिहा.

५. (अ) बटाटा पिकाच्या लागवडी विषयी खालील मुद्यांवर माहिती लिहा : ८

(i) वनस्पतीशास्त्रीय नाव व कुळ

(ii) जमीन व हवामान

(iii) सुधारीत जाती (कोणत्याही चार)

(iv) हेक्टरी बियाणे व लागवडीचा हंगाम

किंवा

(अ) फरक स्पष्ट करा :

(i) मार्केट गार्डन आणि ट्रक गार्डन ४

(ii) बिजोत्पादनासाठी भाजीपाला बागा व प्रक्रियेसाठी भाजीपाला बागा ४

(ब) फुलकोबी पिकासंबंधी खालील मुद्यांवर माहिती लिहा : ८

(i) वनस्पतीशास्त्रीय नाव व कुळ

(ii) जमीन व हवामान

(iii) लागवडीचे अंतर व बियाणांचे प्रमाण

(iv) कोणत्याही चार जाती

https://www.maharashtrastudy.com
Whatsapp @ 9300930012
Send your old paper & get 10/-
अपने पुराने पेपर्स भेजे और 10 रुपये पायें,
Paytm or Google Pay से

किंवा

(ब) खाण्यात येणाऱ्या भागानुसार आणि हंगामानुसार भाजीपाला पिकांचे वर्गीकरण करा. ८

https://www.maharashtrastudy.com